सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९० ठ. क्र. ३२२
दि. २।३।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका हद्दीतील जुळे सोलापूर भाग १ या भागाचा प्रारुप विकास योजने संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये नियोजन प्राधिकरणाचे निर्णयासाठी प्राप्त झालेले आहेत.मा.नियोजन समितीचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व अधिनियम १९६६ चे कलम २८ (२) अन्वयेची शिफारस/अहवाल सोलापूर महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेकडे दि. १८-११-२०१४ रोजी सीलबंद लखोटे प्राप्त झालेले असून, सदर लखोटे दि. १८-११-१४ रोजी सर्वसाधारण सभेमध्ये उघडण्यांत आले आहेत. त्यानंतर मा.आयुक्त यांनी दि. ११/१२/२०१४ व दि. १७/१/२०१५ अन्वये जुळे सोलापूर भाग १ या विकास योजनांच्या अनुषंगाने प्रारुप विकास योजना संदर्भात नियोजन समितीने सुचविलेल्या फेर बदलाबाबत सर्वसाधारण सभेकडे उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) अन्वये निर्णयासाठी प्राप्त झालेला आहे. सदर नियोजन समितीच्या अहवालाचे अवलोकन केले.

म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम २८ (२) अन्वये नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालातील अ.नं. १ ते ७७ मध्ये नियोजन समितीने ज्या ज्या ठिकाणी भागशः व पूर्णतः आरक्षणामध्ये बदल केलेला आहे तो पूर्णपणे फेटाळण्यात येत असून सोलापूर महानगरपालिका हद्दीतील प्रारुप विकास योजना सोलापूर जुळे सोलापूर भाग १ (सुधारित) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द झालेले प्रारुप विकास योजना प्रमाणे जुळे सोलापूर भाग १ (सुधारित) विकास योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४११ ठ. क्र. ३२३
दि. २१/३/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका हद्दीतील जुळे सोलापूर भाग २ या भागाचा प्रारुप विकास योजने संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये नियोजन प्राधिकरणाचे निर्णयासाठी प्राप्त झालेले आहेत.मा.नियोजन समितीचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व अधिनियम १९६६ चे कलम २८ (२) अन्वयेची शिफारस /अहवाल सोलापूर महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेकडे दि. १८-११-२०१४ रोजी सीलबंद लखोटे प्राप्त झालेले असून, सदर लखोटे दि. १८-११-१४ रोजी सर्वसाधारण सभेमध्ये उघडण्यांत आले आहेत. त्यानंतर मा.आयुक्त यांनी दि. ११/१२/२०१४ व दि. १७/१/२०१५ अन्वये जुळे सोलापूर भाग २ या विकास योजनांच्या अनुषंगाने प्रारुप विकास योजना संदर्भात नियोजन समितीने सुचविलेल्या फेर बदलाबाबत सर्वसाधारण सभेकडे उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) अन्वये निर्णयासाठी प्राप्त झालेला आहे. सदर नियोजन समितीच्या अहवालाचे अवलोकन केले.

म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम २८ (२) अन्वये नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालातील अ.नं. १ ते १२ मध्ये नियोजन समितीने ज्या ज्या ठिकाणी भागशः व पूर्णतः आरक्षणामध्ये बदल केलेला आहे तो पूर्णपणे फेटाळण्यात येत असून सोलापूर महानगरपालिका हद्दीतील प्रारुप विकास योजना सोलापूर जुळे सोलापूर भाग २ (सुधारित) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द झालेले प्रारुप विकास योजना प्रमाणे जुळे सोलापूर भाग २ (सुधारित) विकास योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका